
ePaper
रशियाचा युक्रेनवर भीषण हल्ला, 100 हून अधिक ड्रोन डागले!
| वर्ष - 8 | अंक - 329 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

## आतील पानांत


- वियान मुल्डर आहे तरी कोण?
- कानामागून आला अन् 'त्रिशतकवीर' झाला!
- डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा निर्णय
- चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप...


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 8 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा यशस्वी, मनोमीलन तर झाले, पण राज ठाकरे म्हणतात, 'वेट अँड वॉच'!

# उद्धव-राज 'युती' बाबत संभ्रम!

### उद्धव ठाकरे यांची 'युती' लवकर करण्यासाठी आग्रही, दुसरीकडे राज यांचे शांत बसण्याबाबत कार्यकर्त्यांना आदेश!

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**मराठी भाषा आणि हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर शिवसेनेच्या उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे एका व्यासपीठावर आले खरे, त्यांचे मनोमीलन झाले, असे म्हणणाऱ्यांना आता मात्र धक्का बसला आहे. उद्धव हे लवकरात लवकर 'युती' व्हावी याबाबत आग्रही आहेत तर राज ठाकरे मात्र 'ठंडा करके खाओ' किंवा 'वेट अँड वॉच' भूमिकेमध्ये गेले आहेत.**



### ठाकरे बंधू वीस वर्षांनी एकत्र !

त्रिभाषा सूत्रावरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे तब्बल वीस वर्षांनी एकत्र आले. ठाकरे बंधूंचा मेळावा दि. ५ जुलै रोजी मुंबईतील एनएससीआय डोममध्ये साजरा झाला. एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी या मेळाव्यात भूमिका मांडली. मात्र, राज ठाकरेंनी 'युती' बाबत सावध भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले.

### मेळाव्याबाबत संजय उवाच..

उबाठा गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत विविध मुद्द्यांवर भाष्य केले. ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यानंतर आता ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची चर्चा सुरू झाली आहे. याबाबत काही प्रक्रियेला सुरुवात झाली आहे का? असे विचारले असता संजय राऊत म्हणाले की, पाच तारखेला जो मराठी भाषेचा विजयोत्सव झाला, त्याबाबत जनता अद्यापही चर्चा करत आहे. महाराष्ट्राची जनता या एका क्षणाची गेल्या वीस वर्षांपासून वाट पाहत होती आणि तो क्षण आल्यावर आता जनतेच्या अपेक्षा नक्कीच उंचावलेल्या आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून एक भूमिका स्पष्ट व्हावी, अशी लोकांची अपेक्षा जरी असली तरी योग्य वेळी योग्य गोष्टी घडत असतात.

### सांस्कृतिक मंत्री... संयमी भाष्य अपेक्षित !

राऊत म्हणाले, की काहीजण ठाकरेंवर दबाव आणू पाहत आहेत का? तुम्ही मराठी माणसाची एकजूट होऊ देत नाही, एका विद्वान मंत्र्यांनी महाराष्ट्र विजय दिवसाची तुलना पहलगाम हल्ल्याशी केली. राज्याच्या सांस्कृतिक मंत्रीपदावर बसलेल्या व्यक्तीने अशी विधाने करू नयेत. सांस्कृतिक मंत्र्यांनी तरी किमान सुसंस्कृत आणि संयमी भाष्य केले पाहिजे.

### पहेलगाम अतिरेक्यांशी तुलना चुकीची

पहलगाम हल्ल्याच्या अतिरेक्यांशी तुलना करणे, मराठी भाषेसाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांसंदर्भात असे विधान करणे, त्यांना अतिरेकी ठरवणे, हे चित्र काय सांगत आहे? सरकार आणि मंत्र्यांना ठाकरे बंधू एकत्र आलेले नको आहेत. त्यांना मराठी भाषा या राज्यांमध्ये अभिमानाने झळकलेली नको, त्यांना मराठीचा वैभव आणि गौरव व्हावा, असे वाटत नाही आणि त्यामुळेच मराठीसाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांची तुलना पहलगामच्या अतिरेक्यांशी करत आहेत, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी आशिष शेलार यांच्यावर केला.

### राज ठाकरे यांनाच विचारा..

राज ठाकरेंकडून 'युती' बाबतचे कुठलेही संकेत व्यक्त करण्यात आले नाहीत. तर उद्धव ठाकरे हे राजकीय युतीसाठी जास्त आग्रही आहेत, अशी चर्चा आता रंगली आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, हे तुम्ही राज ठाकरे यांनाच विचारा. आमच्याकडून आम्ही सातत्याने मराठीसाठी, महाराष्ट्रासाठी जो हात पुढे केलेला आहे, तो कायम आहे. मराठी माणसाच्या मनातील भावना किंवा जो संताप आहे, त्या संतापाला वाट करून देण्याचे काम सुद्धा आम्ही करतो.

### काँग्रेस मराठी प्रश्नापासून दूर..

### राज ठाकरे यांची भूमिका निर्णायक ठरणार!

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात, मराठी माणसांची एकजूट व्हावी आणि स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण व्हावे, असे भावनिक आवाहन केले. पण, भविष्यात युती कायम राहील, याबाबत कोणताही स्पष्ट संकेत दिला नाही. त्यामुळे 'युती' साठी उद्धव ठाकरे यांनी हात पुढे केले असले तरी राज ठाकरे यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. आता मराठीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे वीस वर्षांनी एकत्र आले असले तरी मनसे आणि उबाठागटाची युती होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे, त्याबद्दल सर्वत्र कमालीची उत्सुकता आहे.

आता मुख्य मुद्दा आहे तो म्हणजे राज आणि उद्धव एकत्र आले तर 'महाविकास आघाडी' चे अस्तित्व काय असणार ? काँग्रेसने आतापासूनच स्वबळाची चाचपणी सुरू केली आहे. काँग्रेस मराठीच्या विजयी मेळाव्यापासून दूर राहिली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस हे मराठीच्या प्रश्नापासून दूर जाणार आहे का? याची चर्चा राजकीय नेत्यांमध्ये मात्र सुरू आहे.

### 'युती'बाबत न बोलण्याचे आदेश..

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्या 'युती: संदर्भात कोणीही बोलू नये, असे आदेश राज ठाकरे यांनी त्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. कोणत्याही पदाधिकाऱ्यांनी युती संदर्भात बोलताना आधी मला विचारावे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.त्यामुळे शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन पक्षांच्या युती संदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे.

# राज्यात घोऽऽ घोऽऽ पाऊस!

## सावधान! राज्यात वादळी वाऱ्यासह तुफान पावसाचा अंदाज

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह तुफान पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. दि. 9 जुलैपर्यंत सर्वत्र धो SS धो SS पाऊस अक्षरशः धुमाकूळ घालेल, असा इशारा देण्यात आला आहे. अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्राकार वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे. राज्यात दि. 9 जुलैपर्यंत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे .**

मुंबईसह संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर तसेच मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची हजेरी राहील. या कालावधीत तळ कोकणापासून संपूर्ण किनारपट्टी भागात पावसाचे ऑरेंज अलर्ट आहेत .मध्य महाराष्ट्रातील घाटमाथा परिसरावर जोरदार पावसाची शक्यता आहे . उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार राज्यातील अनेक भागांमध्ये रविवारी जोरदार पावसाने हजेरी लावली. मुंबई आणि उपनगरांमध्ये जोरदार पाऊस झाला.अंधेरीमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे सब-वेमध्ये पाणी साचल्याने तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचल्याचे चित्र आहे. दुसरीकडे पालघर जिल्ह्यात देखील अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. वसई आणि विराराला पावसाने चांगलेच झोडपले आहे.



या पावसामुळे सायंकाळी घरी जाणाऱ्या चाकरमान्यांचे मोठे हाल झाले. जिल्ह्यात ढगाळ वातावरण असून, रात्री देखील जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, रविवार सकाळपासून कल्याण आणि डोंबिवली परिसरात पावसाची रिपरिप सुरू होती. काही वेळा हलक्या सरी तर अधूनमधून जोरदार पावसाच्या सरी पडल्या. भिवंडीत दुपारपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील, तीनबत्ती बाजारपेठेमध्ये पाणी साचले आहे. अनेक छोट्या-मोठ्या दुकानात पाणी शिरल्याचा घटना देखील घडल्या. या पावसामुळे व्यावसायिकांचे चांगलेच हाल झाले, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाणी आले आहे. या पार्श्वभूमीवर नदी काठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्यानंतर रामकुंडातील पाणी वाढले आहे. पुणे शहर, पिंपरी चिंचवड त्याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यामध्ये पावसाची संततधार असून सखल भागात पाणी चांगलेच साठले आहे आणि नागरिकांचे हात होत आहेत. खेडोपाडी मात्र शेतकऱ्यांच्या पिकांचे बऱ्यापैकी नुकसान झाले असून हाल झाल्याचे शेतकरी वर्ग सांगत असून चांगलाच चिंतेत आहे.प्रादेशिक हवामान केंद्र आणि पृथ्वी मंत्रालयाने एकत्रितपणे जाहीर केलेल्या ताज्या हवामान अंदाजानुसार, दि. 9 जुलैपर्यंत महाराष्ट्रात सर्वदूर पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्राकार वाऱ्यांमुळे पश्चिम बंगाल व आजूबाजूच्या परिसरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे.

### पावसाचा जोर कुठे राहील?

दि.7 जुलै : पुणे, घाटमाथ्यावर रेड अलर्ट, त्याचप्रमाणे, रत्नागिरी, रायगड,भंडारा गोंदिया,नाशिक व साताऱ्याचा घाटमाथा येथे ऑरेंज अलर्ट!मुंबई, ठाणे ,पालघर, नाशिक, नंदुरबार ,धुळे ,जळगाव ,छत्रपती संभाजीनगर, जालना ,परभणी, हिंगोली, नांदेड,नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या ठिकाणी ऑरेंज अलर्ट! दि. 8 जुलै : रत्नागिरी, गोंदिया आणि सातारा घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट, रायगड सिंधुदुर्ग नागपूर ,भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली तसेच कोल्हापूर आणि पुणे घाटमाथ्यावर पावसाचा यलो अलर्ट राहील. दि. 9 जुलै : तळ कोकणासह पुढे सातारा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावरील पावसाचा यलो अलर्ट, नागपूर भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांचाही समावेश आहे.

---

# बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल!

## संगमवाडीवरून येरवड्याकडे जाताना होणाऱ्या कोंडीवर दिलासा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संगमवाडीवरून येरवडा, लोहगाव विमानतळ तसेच विश्रांतवाडीकडे जाताना होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल तसेच ग्रेड सेपरेटर उभारण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील अडीच वर्षांत ही दोन्ही कामे पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न असून, यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने या कामांसाठी खर्चाचे दायित्व ७२ (ब) अंतर्गत महापालिकेने घेतले आहे.**




स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता दिल्याने यातील अडचणी दूर झाल्या आहेत.शहराच्या पूर्व भागातून जुन्या मुंबई पुणे महामार्गाकडे जाण्यासाठी तसेच शहराच्या मध्यवर्ती भागातून विमानतळ आणि अहिल्यानगर रस्त्याकडे जाण्यासाठी प्रामुख्याने हा रस्ता वापरण्यात येतो. विश्रांतवाडीकडे जाणारे वाहनचालकदेखील बिंदूमाधव ठाकरे चौकाचा वापर करतात. त्यामुळे संपूर्ण दिवसभर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. या दोन्ही कामांसाठी सर्वसाधारण ११५ कोटी ७३ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे. महापालिकेच्या २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात या कामासाठी केवळ ८ कोटींची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही तरतूद कमी असल्याने महापालिकेकडून या प्रकल्पाचे दायित्व स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या पुलाचे तसेच ग्रेड सेपरेटरचे काम करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बंडगार्डन ते खडकीच्या दिशेने चार पदरी १५.६० मीटर रुंदीचा उड्डाणपूल असणार आहे. त्याची लांबी ६२० मीटर राहणार आहे. खडकीच्या दिशेने तो १३० मीटर, तर बंडगार्डनच्या दिशेने १५८ मीटर असेल. रॅम्पसह एकूण लांबी ९०८ मीटर असेल. चौकात उभारण्यात येणारा ग्रेड सेपरेटर संगमवाडी ते विमानतळ आणि संगमवाडी ते बंडगार्डनकडे जाणारा असणार आहे. संगमवाडी ते विमानतळ मार्गाचे अंतर २१० मीटर असणार असून, त्यातील ६० मीटर भाग पूर्णपणे बंदिस्त असणार आहे. बंडगार्डनकडे जाणारा मार्ग २८९ मीटर रूंद असून, त्याचा बंदिस्त भाग ८० मीटर असणार आहे. हे दोन्ही भुयारी मार्ग ७ मीटर रुंदीचे असणार आहेत.संगमवाडी येथून येरवड्याकडे जाणाऱ्या बिंदूमाधव ठाकरे चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका तेथे उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर उभारणार आहे. पुढील अडीच वर्षांत हे काम पूर्ण करायचे असल्याने ७२ ब अंतर्गत दायित्व स्वीकारण्याचा प्रस्ताव स्थायी

### शहराच्या मध्यवर्ती भागातून विमानतळ

स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता दिल्याने यातील अडचणी दूर झाल्या आहेत.शहराच्या पूर्व भागातून जुन्या मुंबई पुणे महामार्गाकडे जाण्यासाठी तसेच शहराच्या मध्यवर्ती भागातून विमानतळ आणि अहिल्यानगर रस्त्याकडे जाण्यासाठी प्रामुख्याने हा रस्ता वापरण्यात येतो. विश्रांतवाडीकडे जाणारे वाहनचालकदेखील बिंदूमाधव ठाकरे चौकाचा वापर करतात.

## तीन वर्ष खाजगी एजन्सीकडून स्टाफची नेमणूक

# महापालिका रुग्णालयांतील कंत्राटी स्टाफसाठी तब्बल 282 कोटींचा खर्च!

## वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, इतर पॅरामेडिकल स्टाफची नेमणूक

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव, पिंपरी कॅम्पातील जिजामाता, आकुर्डीतील प्रभाकर कुटे आणि चिंचवड येथील तालेरा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, इतर पॅरामेडिकल स्टाफ, तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यासाठी एजन्सी नेमण्यात आली आहे. तीन वर्षांसाठी सर्व मनुष्यबळ पुरविण्यासाठी तब्बल १६२ कोटी ५५ लाख ४४ हजार ७५६ रुपये खर्च अपेक्षित आहे. तर, यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय, नेत्र रुग्णालय, वायसीएमधील पोस्ट मॉ र्टेम सेंटर व कुटुंब कल्याण केंद्र, नवीन भोसरी, सांगवी, यमुनानगर रुग्णालयांसाठी सर्व मनुष्यबळ पुरविण्यासाठी तब्बल १२० कोटी खर्च केला जाणार आहे. असे एकूण २८२ कोटी रुपये खर्च महापालिका मनुष्यबळावर करणार आहे.**




> वैद्यकीय विभागाकडे मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे रुग्णालयांत खासगी एजन्सीमार्फत वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जात आहे. रुग्णांना उत्तम वैद्यकीय सेवा देण्यास मदत होत आहे. त्यांच्या कामकाजावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची देखरेख असणार आहे.
>
> **-डॉ. लक्ष्मण गोफणे,** मुख्य आरोग्य व वैद्यकीय अधिकारी.

रुग्णालयांसाठी मनुष्यबळ पुरविण्यासाठी वैद्यकीय मुख्य कार्यालयाने २१ सप्टेंबर २०२४ ला ११६ कोटी ३ लाख ४३ हजार ९७२ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली होती. त्यासाठी ३ एजन्सींनी सहभाग घेतला. त्यातील २ एजन्सी पात्र ठरल्या. बीव्हीजी इंडियाने १८.२९ टक्के आणि रुबी अलकेअर सर्व्हिसेसने १८.१० टक्के सेवाशुल्क दर सादर केला होता. रुबी अलकेअर सर्व्हिसेसने ९.८ टक्के अंतिम सेवा शुल्क सादर केला. तो लघुत्तम असल्याने हे काम त्या एजन्सीला देण्यात आले आहे.

महापालिकेच्या या चार रुग्णालयांत वैद्यकीय विभागाने निश्चित केलेल्या संस्थेनुसार वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, इतर पॅरामेडिकल स्टाफ, आया, वॉर्ड बॉय, ऑपरेटर, व्यवस्थापक, तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करणे. त्यांना दरमहा किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे. त्यासाठी तीन वर्षांसाठी एकूण १६२ कोटी ५५ लाख ४४ हजार ७५६ रुपये खर्च येणार आहे. त्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय, नेत्र रुग्णालय, वायसीएममधील पोस्ट मॉर्टेम सेंटर व कुटुंब कल्याण केंद्र, नवीन भोसरी, सांगवी, यनुमानगर या पाच रुग्णालयांसाठी सर्व मनुष्यबळ पुरविण्यासाठी बीव्हीजी इंडिया या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. या कामासाठीही वरील दोन एजन्सीचे दर आले होते. बीव्हीजीने लघुत्तम ९.८ टक्के अंतिम सेवाशुल्क दर सादर केला आहे. सर्व प्रकाराचे मनुष्यबळ पुरविण्यासाठी तीन वर्षांसाठी तब्बल ११९ कोटी ८० लाख ९९ हजार ११६ रुपये खर्च होणार आहे. त्या प्रस्तावालाही आयुक्तांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे. असे एकूण २८३ कोटी रुपये खर्च महापालिका रुग्णालयातील मनुष्यबळावर करणार आहे.

---

# पवना धरणातून २ हजार ८०० क्युसेक्स विसर्ग !

## आपत्कालीन यंत्रणेने दक्ष राहावे – आयुक्त शेखर सिंह

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. पवना व मुळशी धरणात पाण्याची आवक वाढली असल्याने या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.**



आज सकाळी १० वाजल्यापासून पवना धऱणातून पवना नदीपात्रात २ हजार ८०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे. तर दुपारी २ वाजल्यापासून मुळशी धऱणातून मुळा नदी पात्रात ८ हजार २०० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. हवामान विभागाने पुढील काही तास धरण क्षेत्र आणि घाटमाथ्यावर पाऊस होण्याचा इशारा दिला असल्याने धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पवना आणि मुळा नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहावे. नदीपात्राजवळ कोणीही जाऊ नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.

### महापालिकेची यंत्रणा सज्ज

आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देऊन कार्यवाही करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. मदत व बचाव पथकेही आवश्यक उपकरणासह सज्ज ठेवण्यात आली आहेत. आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तत्काळ मदत मिळण्यासाठी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्यात आला आहे. तसेच महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त व सहाय्यक आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

### प्रसार माध्यमांवर दिली जातेय अद्यावत माहिती

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रातील पावसाबाबत तसेच धरणातून नदीपात्रात करण्यात येणाऱ्या विसर्गाबाबत अद्यावत माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत समाज माध्यमांवर (फेसबुक, एक्स (पूर्वीचे ट्विटर), इंस्टाग्राम ) दिली जात आहे. तरी नागरिकांनी अद्यावत माहितीसाठी महापालिकेच्या समाज माध्यमांना भेट द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### आग्निशामक विभाग महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७५

भोसरी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७६

प्राधिकरण अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७७

चिखली अग्निशमन केंद्र – ८६६९६९४१०१

थेरगाव अग्निशमन केंद्र – ७०३०९०७९९९

रहाटणी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७८

मोशी अग्निशमन केंद्र – ७२६४९४३३३३

तळवडे अग्निशमन केंद्र - ९५५२५२३१०१

### पूर नियंत्रण कक्ष व इतर महत्त्वाचे दुरध्वनी क्रमांक

मध्यवर्ती पूरनियंत्रण कक्ष – ०२० २८३३११११ / ०२० ६७३३११११

अ क्षेत्रिय कार्यालय - ०२० ६८३३४०५०

ब क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४३००

क क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४५००

ड क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४७००

इ क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५०००

फ क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५३००

ग क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५५००

ह क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५७००

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



'स्टेट'मेंट
राहुल जगताप

### मूल होऊन भगवंतापाशी जावे.

या जगात कर्माशिवाय कोण राहतो ? पण कर्म यथासांग होत नाही याचे कारण, आपण कर्म कशाकरिता करतो याची जाणीवच होत नाही आपल्याला. अधिष्ठानाशिवाय कर्म साधत नाही. मालक पाठीशी असला की कर्म करणाऱ्याला जोर येतो. काही चांगली कर्ममार्गी माणसे भक्तिमार्गी लोकांना नावे ठेवतात. भक्तिभावाने जो राहतो तो दुसऱ्याला नावे ठेवीत नाही. ' मी कोण ' हे जाणायला ज्ञान आणि भक्ती लागतेच; तसेच, ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' म्हटले तरी त्याचा अनुभव येण्यासाठी कर्म करावेच लागते. उपासना, भगवंताला ओळखून करावी. लहान मूल आईकडे डोळे करून मुकाट्याने दूध पिते, त्याप्रमाणे समर्थांसारख्यांनी जे सांगितले ते आम्ही निमूटपणे करावे. डोळे मिटून जितके काम होईल, अंधश्रद्धेने जे होईल, ते अभिमानाने, ज्ञानाचे डोळे उघडे ठेवूनही नाही होणार. मूल होऊन भगवंताला ओळखावे. याला अडचण एकच असते; माझे ' शहाणपण ' आड येते. भक्त मुलांसारखे वागतात, म्हणून त्यांचे लाड देव पुरवितो. कुणी असे म्हणतील की, " भगवंताची आणि आमची ओळख नाही, तर त्याची आम्ही कशी पूजा करावी ? " " त्याला ओळखल्याशिवाय मी भजन करणार नाही " हे म्हणणे वेडेपणाचेच आहे. भगवंताला पुष्कळ मार्गांनी ओळखता येईल. पांडुरंगाकडे जाण्यासाठी काही मार्ग आधी आक्रमणे जरूर आहे. संतांनी अखंड जागृत राहण्याचा मार्ग सांगितला; तो असा की, देहाने प्रपंच करा, पण मन भगवंताच्या ठिकाणी अर्पण करा. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाल्याशिवाय इतर काहीही करून उपयोग नाही. ध्येय सत्य असल्याखेरीज चित्ताची स्थिरता होत नाही; पण सत्य अशा ध्येयावर अगोदर पूर्ण श्रद्धा पाहिजे. प्रपंचात जशी प्रेमाची गरज आहे तशी परमार्थात श्रद्धा पाहिजे. ' देव माझा आहे ' असे म्हणण्याऐवजी ' मी देवाचा आहे ' असे म्हणावे, म्हणजे श्रद्धा उत्पन्न होते. समुद्राचा तरंग असतो, तरंगाचा समुद्र असतो असे नव्हे. साधनात निश्चितपणा असेल तर त्यात समाधान आहे; म्हणून साधन श्रद्धेने करीत जावे. जशी श्रद्धा तशी फळे. आपण भगवंताच्या स्मरणात निर्धास्त असावे. प्रपंचात कधीच धीर सोडू नये. ज्याप्रमाणे मुंग्यांची राणी जागेवरून हलवली की तिच्यामागे असणाऱ्या हजारो मुंग्या तिच्याबरोबर नाहीशा होतात, त्याप्रमाणे एक देहबुद्धी काढून टाकली, की आपल्या मनात उठणारे हजारो संकल्प नाहीसे होतात. या देहबुद्धीच्या पलीकडे गेल्यावर जे ज्ञान होते त्यालाच आत्मज्ञान म्हणतात. असे आत्मज्ञान झाल्यावर जे पूर्ण समाधान मिळते तेच खरे भगवंताचे दर्शन होय.

बोधवचन:- भक्तिमार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे. प्रपंचाकडचे प्रेम भगवंताकडे वळविले की भक्ति येते.

# भाजपा, संघाच्या समाजसेवेची हमी, 'मार्केटिंग' मध्ये मात्र नेहमीच कमी !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारतीय जनता पार्टी आणि त्यांची मातृ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या कार्यकर्त्यांच्या समाजसेवेबद्दल बोलावे तेवढे थोडेच आहे. विमान दुर्घटना असो, महापूर असो, भूकंप असो किंवा कुंभमेळ्यासारखे मोठमोठे सोहळे असोत..तिथे संकट उद्भवले तर मदतीसाठी धावणारी ही मंडळी ! कसलाही गाजावाजा न करता आपले समाजसेवेचे कार्य बिनबोभाटपणे करून समाधानाने परतणारी ही मंडळी..पण, ते कार्य यांनीच केले, हे समाजाला समजायला नको का ? त्यांच्या मते नको.. पण, समाजातील एक प्रवाह आता पुढे येत आहे की याचे 'मार्केटिंग' हे झालेच पाहिजे!**

### न बोलणाऱ्याचे सोने सुद्धा गंजते!

बोलणाऱ्याचे गहू विकले जातात, न बोलणाऱ्याचे सोने सुद्धा विकले जात नाही, ही म्हण म्हणूनच आठवली आणि ती भाजपा आणि संघाला चपखलपणे लागू होते. हा चर्चा करण्याचा मोठा विषय आहे, पण ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे, त्यांना आपण केलेल्या सुकृत्याचा कसलिही प्रसिद्धी नको असते!

### पंढरीच्या वारीची परंपरा..

'पंढरीची वारी' गेले सुमारे ८०० वर्ष सुरूच आहे. अस्मानी-सुलतानी संकटे आली तरी यात कधीच खंड पडला नाही. निशस्त्र वारकऱ्यांवर इस्लामी राजवटीत हल्ले होऊ लागल्यावर त्यांच्या रक्षणार्थ धारकरी आले. पण, त्या काळी सुद्धा वारी सुरूच राहिली. स्वातंत्र्यानंतरही वारीत खंड पडलाच नाही. परंतु, गावोगावी 'हज हाऊस' उभे करणाऱ्या एकाही सत्ताधाऱ्याला पंढरीची वाट कोसळत्या पावसात चालणारे वारकरी कधी दिसलेच नाहीत, हे आमचे दुर्दैव आहे !

### संकटकाळी पहिली धाव संघाची..

सत्ता नसतानाही सत्ताधाऱ्यांशी जुळवून घेत 'निर्मल वारी' सुरू झाली आणि वारीचा मार्ग स्वच्छ राहील, महिला वारकऱ्यांचे हाल होणार नाहीत, याची काळजी घेणारी एक अराजकीय यंत्रणा त्याकाळी उभी राहिली. एका दिवसात लक्षावधी विठ्ठलभक्त पंढरपुरी येणार, मग त्यातून निर्माण होणारी अस्वच्छता लक्षात घेऊन 'निर्मल वारी' च्या माध्यमातून वारकरी आणि नागरिकांच्या हिताची आणि आरोग्याची चिंता केली, ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने! आणि गेली सुमारे २५ वर्षे हे मिशन संघाची मंडळी महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने राबवत आहेत, कोणतीही धावपळ, गाजावाजा न करता बिनदिक्कतपणे आणि शांतपणे हे कार्य सुरू आहे!

### मोक्षाची वाट चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी..

मोक्षाची वाट चालणाऱ्या वारकऱ्याला वाटेत अन्नदान करणारे शेकडो जण पुढे येतात, पण मुसळधार कोसळत्या पावसात चालणाऱ्या वारकऱ्याला रिफ्लेक्टरसह रेनकोट द्यायला फडणवीस यांना मुख्यमंत्री व्हावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. वारकऱ्यांना रेनकोट दिले गेले, महामार्गावर त्यांच्यासाठी वेगळी वाट बनवली गेली, हे सगळे फडणवीस यांच्या कारकीर्दीत हे अनेकांना माहीततही नाही.

### वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा..

या वैष्णव मंडळींचा देव विष्णु जरी क्षीरसागरात बसला असेल आणि साक्षात लक्ष्मी त्याचे पाय चेपत असली तरी आमचा वारकरी तसा दरिद्रीच..बिचारा पंढरीच्या त्या सावळ्या विठ्ठलाच्या मोहात पडून शेकडो किलोमीटर पायाने तुडवत जाणार.. मग ठिकठिकाणी त्याला वैद्यकीय सुविधा प्रदान करणे, त्याच्या पायांना हातांना छान प्रेमाने मसाज करणे, या सुविधा देण्याचे काम कोणाचे? अर्थातच भाजपा आणि संघाचे! आता प्रश्न उपस्थित केला जाईल..हे या आधी होत नव्हते का ? निश्चित होत होते. पण, प्रमाण कमी होते. मग फडणवीस यांनी नेमके नवीन काय केले ? कर्तव्य विरुद्ध आत्मीयता आणि जबाबदारी यातील फरक ज्यांना समजेल, त्यांना फडणवीस यांनी नेमकी काय जादू केली आहे ते उमजेल, हे नक्की !

### वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुखकर..

आता दुसरा मुद्दा..हल्ली, वारकऱ्यांच्या दिंडींना आर्थिक निधी दिला जात आहे. वारकऱ्यांच्या या पायी प्रवासाला अधिकाधिक सुखकर बनवण्याचे प्रयास होत आहेत. आता वारी विठ्ठल भरोसे नसून महाराष्ट्र शासन आपले कर्तव्य, जबाबदारी आणि आपल्या हातून घडणारी ईश्वर सेवा या भावनेतून वारकऱ्यांची सेवा करत आहेत आणि हा बदल देवेंद्र फडणवीस यांनी घडवला आहे, हे तरी किती जणांना माहीत आहे!

### फडणवीस यांना जेरीस आणण्याचे प्रयत्न..

२०१४ ते २०१९ या कालखंडात फडणवीस यांना जेरीला आणायचे जे प्रयास झाले, त्यात तुम्ही आषाढी एकादशीला शासकीय महापूजेला आला, तर आम्ही वारीत साप सोडून देऊ अशी धमकी सुद्धा दिली गेली.. मेंदूला ताण देऊन थोडेसे आठवा..फडणवीस त्या वर्षी गेले नाहीत. नंतर सत्तांतर झाले म्हणून गेले नाहीत. आता परत एकदा दणदणीत बहुमत मिळवून फडणवीस शासकीय महापूजेचा बहुमान उपभोगत आहेत, काहींना ही बाब दुःखाची आहे तर काहींसाठी सुखाची नक्कीच आहे!

### धमकी देणारे कुठे आहेत ?

फडणवीस यांनी शांतपणे केलेले काम वारकऱ्यांच्या हृदयात पोहचले आणि म्हणूनच असे घवघवीत यश मिळाले. साप सोडण्याची धमकी देणारे कोणत्या बिळात जाऊन लपले समजत नाही. फडणवीस यांचा संयम पांडुरंगाला भावला आणि म्हणूनच त्यांना महापूजेचे भाग्य पुन्हा एकदा आणि हक्काने प्राप्त झाले, हे लक्षात घ्या. भाजपा आणि संघाला आपले सोने विकता येत नसेल, हे समजू शकतो.

### दिखता हैं, वही बिकता हैं..

परंतु, आजच्या काळातील 'दिखता हैं, वही बिकता हैं' या सिद्धांताला समजून घेऊन त्यांच्या पक्षाने तरी सकारात्मक मुद्द्यांचा आक्रमक प्रचार करण्याचे मनावर घ्यावे, असे वाटते. अन्यथा, सत्ता वाचवण्यासाठी केल्या जाणाऱ्या मनोमीलनाचे ओशाळवाणे सोहळेच महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांना बघावे लागतील. अर्थात् शेवटी नकली आणि असली यातील फरक जनता जाणते, आणि वेळ आली की नको त्याचे उट्टे काढले जातात, ज्याचे काम आवडते त्याच्या बाजूने भरभरून दान टाकले जाते, तो भाग वेगळा!



महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यात पुन्हा एकदा मेगा भरती!

## कायम स्वरूपी पदे भरा, कर्मचारी संघटनेची मागणी



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केल्याच्या धर्तीवर महानगरपालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लवकच होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा मेगा नोकर भरतीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत केली. राज्यात विविध विभागातील रिक्त पदांचा आढावा घेतला जात असून विविध विभागांना त्यांचे आकृतिबंध मंजूर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नोकरभरतीबाबत सरकार कुठेही मागे नसल्याचे फडणवीस यांनी सांगितले. यावर भरती करताना कंत्राटी पद्धतीने भरती नको, अशी भूमिका कर्मचारी संघटनेने घेतली आहे.**

मंत्रालयात आदिवासी विभागाच्या आरक्षित जागांवर बोगस आदिवासींनी नोकऱ्या मिळविल्याबाबत भीमराव केराम यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी नोकरभरतीची घोषणा केली.माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या काळात राज्यात विविध विभागात ७५ हजार नोकर भरतीची घोषणा करण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र एक लाखाहून अधिक पदांची भरती करण्यात आली असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, सरकारच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक विभागांना त्यांचा आकृतिबंध मंजूर करण्याचे तसेच सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.नोकर भरतीचे सध्याचे नियम खूप जुने असून काळानुरुप त्यात बदल करण्याची गरज आहे. सध्याच्या सेवाप्रवेशानुसार एखाद्या विभागात भरती प्रक्रिया सुरु झाली की उमेदवार लगेच न्यायालयात जातात. तेथे वर्षानुवर्षे भरती प्रक्रिया लटकते. त्यामुळे सर्व विभागांना भरतीसाठी नव्याने नियम तयार करण्यात सांगण्यात आले असून त्याला मान्यता मिळताच मेगा भरती सुरु केली जाईल, असे फडणवीस यांनी जाहिर केले. बोगस आदिवासींनी आदिवासींच्या नोकऱ्यांवर केलेल्या कब्जाबाबत बोलताना, आदिवासी असल्याचे बोगस दाखले सादर करुन सन १९९५पूर्वी ज्यांनी आदिवासांच्या नोकऱ्या मिळविल्या त्यांना सर्वोच्च न्यायालयानेच संरक्षण दिले आहे. राज्य सरकारने सन २००५पासून आदिवासी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नोकरीत प्रवेश न देण्याचा कायदा केला आहे.तर सन १९९५ ते २००५ या १० वर्षाच्या काळात बनावट प्रमाणपत्राच्या आधारे आदिवासींच्या जागेवर नोकरी मिळविलीलेल्या ६ हजार ८६० कर्मचाऱ्यांवर कारवाईचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र या कर्मचाऱ्यांची २० वर्षाहून अधिक काळ नोकरी झाल्यामुळे त्यांच्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून आदिवासांच्या ६ हजार ८६० जागा मुक्त करुन त्यावर नव्याने भरती सुरु करण्यात आली आहे. येत्या काळात आदिवासींच्या सर्व रिक्त जागा भरण्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली.

### ही प्रक्रिया गतीमान करण्यात आली

जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास होणारा विलंब दूर करण्यासाठी सर्व जात पडताळणी समित्यांवर अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करुन ही प्रक्रिया गतीमान करण्यात आली आहे. मात्र त्यातील दोष दूर करुन ही प्रक्रिया अधिक गतीमान करण्यासाठी सचिवांचा गट स्थापन करण्याची घोषणाही फडणवीस यांनी केली.राज्य सरकारची पुन्हा मेगा नोकरभरतीची घोषणा म्हणजे बोलाचाच भात बोलाचीच कढी असा प्रकार असून विविध विभाग, सरकारी मंडळ आणि कंपन्यातील कंत्राटी भरतील नोकर भरती असे भासवून सरकार आपली पाठ थोपटून घेत असल्याची टीका राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी केली आहे. याच सरकारच्या मागील कार्यकाळात ७५ हजार पदांच्या भरतीची घोषणा करण्यात आली होती. मात यातील बहुतांश पदे कंत्राटी स्वरुपाची होती. सरकारने ७५ हजार पदांचा विभागनिहाय तपशील जाहीर करावा

# फुके कुटुंबियांच्या सुनेचे आंदोलन!

## सासरकडून जाच ; फडणवीसांना न्यायासाठी साकडे




। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**प्रिया फुके यांनी दिर, भाजप आमदार परिणय फुके आणि कुटुंबीयांविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून सोमवारी त्यांनी विधान भवनासमोर आंदोलन केले. मात्र, पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. दरम्यान, सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या जाचामुळे आपल्या दोन लहान मुलांचे भवितव्य टांगणीला लागल्याची खंत व्यक्त त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून तात्काळ न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी प्रिया फुके यांनी केली आहे.**

सत्ता, अधिकार, आर्थिक सुबत्ता असलेल्या अनेक घरांमधील स्त्रियांचा मानसिक छळ होत असल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. नागपूरमधील फुके कुटुंबातील वाद चव्हाट्यावर आला आहे. आमदार परिणय फुके यांचा भाऊ आणि प्रिया फुके यांचे पती संकेत फुके यांचा सप्टेंबर २०२२ मध्ये मृत्यू झाला. संकेत यांच्या मृत्युनंतर काही महिन्यांनी प्रिया फुके यांनी सासरच्या मंडळींवर आरोप केले. पतीच्या मृत्युनंतर घरातील सदस्यांनी त्यांच्या बँकेतील सर्व पैसे काढून घेतले. तसेच, जमिनीच्या मालमत्तेतही हेराफेरी करून ती ताब्यात घेतल्याचे आरोप प्रिया फुके यांनी केले आहेत. शिवाय, अन्यायाविरोधात आवाज उठवल्यानंतर आपल्याला दोन लहान मुलांसह घरातून हाकलण्यात आल्याचा आरोप त्यांनी केल आहे.आमदार परिणय फुके यांच्यावरही प्रिया यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत. पतीच्या मृत्यूनंतर निर्माण झालेली आर्थिक कोंडी आणि सासरच्या मंडळींकडून सुरू असलेल्या छळामुळे त्यांना मुलांचे संगोपन करण्यात अडचणी येत आहेत. सासरच्या मंडळींकडून त्यांना घरात येण्यास मज्जाव करण्यात येत असून त्यांच्या मागावर सतत माणसे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### देवेंद्र फडणवीस वेळ मागत आहे

सातत्याने त्यांना बलात्काराच्या आणि ठार मारण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी प्रिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चार वेळा भेट घेतली असून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पोलिसांकडूनही त्यांना सहकार्य मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.गेल्या दीड वर्षांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वेळ मागत आहे. त्यांच्या एका शब्दावर माझ्या दोन मुलांना न्याय मिळेल. मात्र, दुर्दैवाने या प्रकरणाची दखल घेतली जात नाही. मुलांचे शाळेचे शुल्क सुमारे दोन लाख रुपये असून तीदेखील फुके कुटुंब भरत नाही. केवळ शाळा सुरू होताना पहिल्या सहामहिन्यांची शुल्क भरण्यात आले. दोन बहिणी आणि आई असे त्यांचे कुटुंब असून आर्थिक पाठबळ नसल्याने आर्थिक कोंडी होत आहे, असे प्रिया फुके यांनी सांगितले.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा निर्णय!

## जपानवर 25 टक्के आयातशुल्क लादण्याची घोषणा

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे. ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. खरं तर ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणाची (टॅरिफ) जगभरात चर्चा आहे. ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या काही निर्णयांचा जगातील अनेक देशांना फटका देखील बसला आहे. यातच आता डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे.**



दक्षिण कोरिया आणि जपानवर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेनुसार आता दक्षिण कोरिया आणि जपानवर १ ऑगस्ट २०२५ पासून २५ टक्के कर आकारला जाणार आहे. त्यामुळे आता दक्षिण कोरिया आणि जपानमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के कर लादला जाणार असल्याने दक्षिण कोरिया आणि जपानला मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, व्हाईट हाऊसकडून या संदर्भात पत्र देखील प्रसिद्ध करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त मिंटने दिलं आहे.दरम्यान, याचवेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट इशारा देत हे देखील सांगितलं की, जर कोणत्याही देशाने अमेरिकन वस्तूंवर स्वतःचे कर वाढवले तर अमेरिका नवीन २५ टक्के प्रत्युत्तरादाखल वाढ करेल असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी असंही सांगितलं की अमेरिका आणि त्यांच्यातील व्यापार तूट दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या दरांपेक्षा हे दर खूपच कमी आहेत.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांना देखील मोठा इशारा दिला आहे. जो कोणता देश ब्रिक्सच्या अमेरिकाविरोधी धोरणांबरोबर जाईल, त्या देशांवर १० टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादलं जाईल, तसेच या धोरणाला कोणताही देश अपवाद असणार नाही, अशी इशारावजा धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. या संदर्भात ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर एक पोस्ट देखील शेअर केली आहे. या बरोबरच दुसऱ्या एका पोस्टमध्ये ट्रम्प यांनी स्पष्ट केलं की अमेरिकन प्रशासन आज रात्रीपासून अनेक देशांना नवीन शुल्क नियम आणि सुधारित व्यापार करार अटींबाबत अधिकृत पत्रे पाठवण्यास सुरुवात करणार असल्याचं त्यांनी सांगितलं होतं. गेल्या अनेक महिन्यांपासून रशिया व युक्रेनमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. जगभरातील इतर देशांनी मध्यस्थी करूनही दोन्ही देश एकमेकांवरील हल्ले थांबविण्याचं नाव घेत नाहीये. विशेष बाब म्हणजे, रशियाने युक्रेनवरील हल्ले थांबवावे असं म्हणत ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी दोन्ही देशांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, रशियाने त्यांच्या आवाहनाला केराची टोपली दाखवत युक्रेनवरील हल्ले सुरूच ठेवले होते. दरम्यान, युक्रेनवर हल्ला करणाऱ्या रशियाबरोबर कोणत्याही देशांनी व्यापार करू नये, असा सज्जड दम ट्रम्प यांनी जगभरातील अनेक देशांना दिला.

### व्हाईट हाऊसकडून या संदर्भात पत्र

तरीही, चीन व भारतासह बहुतांश देशांनी रशियामधून कच्चे तेल व ऊर्जा खरेदी करणे सुरूच ठेवले. त्यामुळे ट्रम्प यांनी रशियाबरोबर व्यापार करणाऱ्या देशांना धडा शिकविण्यासाठी नवीन विधेयक आणण्याची तयारी देखील केल्याचं बोललं जात आहे.दक्षिण कोरिया आणि जपानवर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेनुसार आता दक्षिण कोरिया आणि जपानवर १ ऑगस्ट २०२५ पासून २५ टक्के कर आकारला जाणार आहे. त्यामुळे आता दक्षिण कोरिया आणि जपानमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के कर लादला जाणार असल्याने दक्षिण कोरिया आणि जपानला मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, व्हाईट हाऊसकडून या संदर्भात पत्र देखील प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

# चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप..!

## पंतप्रधानांकडून दलाई लामांना वाढदिवसाच्या शुभेच्छा; चीनचा संताप

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दलाई लामा यांना त्यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. याचबरोबर हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी केंद्र सरकारमधील काही मंत्र्यांनीही उपस्थिती लावली होती. यानंतर चीन संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले आहे.**



चीनने सोमवारी यावर आक्षेप घेतला असून, भारताकडे याबाबत निषेध व्यक्त केला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग म्हणाले की, भारताने तिबेटशी संबंधित मुद्द्यांची संवेदनशीलता पूर्णपणे समजून घेतली पाहिजे. चीनने म्हटले आहे की, भारताने तिबेटशी संबंधित मुद्द्यांवर चीनला दिलेल्या वचनबद्धतेचा आदर करावा आणि चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, दलाई लामा हे एक राजकीय निर्वासित आहेत, जे चीनमधील फुटीरतावादी कारवायांमध्ये दीर्घकाळापासून सहभागी आहेत. दलाई लामा यांनी धर्माच्या नावाखाली तिबेटला चीनपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे. दलाई लामा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पंतप्रधान मोदींनी ट्विटरवरील पोस्टमध्ये लिहिले की, “दलाई लामा यांना त्यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त १.४ अब्ज भारतीयांसोबत शुभेच्छा देतो. ते प्रेम, करुणा, संयम आणि नैतिक शिस्तीचे प्रतीक आहेत. त्यांच्या संदेशाने सर्व धर्माच्या लोकांमध्ये आदर आणि कौतुकाची भावना निर्माण केली आहे. आम्ही त्यांच्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतो.”तत्पूर्वी, गुरुवारी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी दलाई लामा यांच्याबाबत एक विधान केले होते.ति म्हणून त्यांचा उत्तराधिकारी निवडण्याचा अधिकार फक्त दलाई लामा आणि त्यांनी स्थापन केलेल्या ट्रस्टला आहे.

### अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये

दरम्यान, दलाई लामा १९५९ पासून भारतात राहत आहेत. त्यांनी चीनविरुद्ध बंड केले होते. त्यानंतर माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी त्यांना भारतात आश्रय दिला होता. दलाई लामा यांनी यापूर्वी म्हटले होते की, त्यांचा उत्तराधिकारी चीनबाहेरील मुक्त जगात जन्माला येईल. त्याच वेळी, चीनचे म्हणणे आहे की, दलाई लामांचा उत्तराधिकारी चीनी कायद्यानुसार निवडला जाईल.चीनने सोमवारी यावर आक्षेप घेतला असून, भारताकडे याबाबत निषेध व्यक्त केला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग म्हणाले की, भारताने तिबेटशी संबंधित मुद्द्यांची संवेदनशीलता पूर्णपणे समजून घेतली पाहिजे.चीनने म्हटले आहे की, भारताने तिबेटशी संबंधित मुद्द्यांवर चीनला दिलेल्या वचनबद्धतेचा आदर करावा आणि चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

# ‘सास भी कभी बहू थी’ चा दुसरा भाग येणार

येत्या काळात अनेक नवनवीन चित्रपट, वेबसीरिज प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत मात्र, काहीही झालं तरी भारतात टेलिव्हिजनची लोकप्रियता जराही कमी झालेली नाही. अनेक कलाकार इंडस्ट्रीतील करिअरची सुरुवात छोट्या पडद्यापासून करतात. छोट्या पडद्यावरची कोणती मालिका तुम्हाला कायम लक्षात राहील असा प्रश्न विचारला तर मराठीत ‘वादळवाट’, ‘असंभव’, ‘अग्निहोत्र’ या मालिकांची नावं घेतली जातात. तर, हिंदीत सर्वात आधी ‘क्योंकि सास भी कभी बहू थी’ या मालिकेचा उल्लेख प्रेक्षकांकडून आवर्जून केला जातो. निर्माती एकता कपूरने काही दिवसांपूर्वीच ‘क्योंकि सास भी कभी बहू थी’ या गाजलेल्या मालिकेच्या दुसऱ्या भागाची घोषणा केली होती. या मालिकेला आता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. जुलै २००० मध्ये ही मालिका ऑन एअर झाली होती. २००० ते २००८ या काळात ‘स्टार प्लस’ वाहिनीवर या मालिकेने अधिराज्य गाजवलं होतं. केंद्रीय मंत्री आणि अभिनेत्री स्मृती इराणी यांना याच मालिकेमुळे घराघरांत ओळख मिळाली होती. यात त्यांनी ‘तुलसी विरानी’ ही भूमिका साकारली होती. त्यानंतर काही वर्षांनी त्यांनी राजकारणात प्रवेश केला.आता तब्बल २५ वर्षांनी पुन्हा एकदा ‘तुलसी’ टेलिव्हिजनवर परतण्यासाठी सज्ज झाली आहे. महत्त्वाचं म्हणजे, अभिनेत्री स्मृती इराणी मालिकाविश्वात पुन्हा परतणार का याबद्दल चाहत्यांना शंका होती.

# श्रद्धा कपूर व तिच्या बॉयफ्रेंडचे फोटो काढणाऱ्यांना सुनावलं



श्रद्धा कपूर ही लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री आहे. तिने तिच्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. यासह श्रद्धा सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. सोशल मीडियावर ती तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी चाहत्यांसह शेअर करत असते. तसेच ती चाहत्यांच्या कमेंट्सना उत्तरंही देत असते, त्यामुळे प्रेक्षक तिच्याशी लवकर कनेक्ट होतात. श्रद्धा तिच्या साध्या वागण्यामुळे प्रेक्षकांची लाडकी आहे. पण गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री वेगळे कारणाने चर्चेत आहे. ते म्हणजे तिने नुकताच इन्स्टाग्रामवर शेअर केलेला एक व्हिडीओ. अभिनेत्रीने तिचा एक गंमतीशीर व्हिडीओ पोस्ट केला होता. याला तिने भन्नाट कॅप्शही दिलं होतं. तिच्या या व्हिडीओवर अनेकांनी कमेंट केली होती. तर याच व्हिडीओमध्ये अभिनेत्रीचा बॉयफ्रेंड राहुल मोदीसुद्धा दिसत होता.

# तिलोत्तमा आला धक्कादायक अनुभव

‘लस्ट स्टोरीज २’ व ‘त्रिभुवन मिश्रा: सीए टॉपर’ अशा वेब सीरिजसह अनेक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारणारी बॉलीवूड अभिनेत्री म्हणजे तिलोत्तमा शोम (TILLOTAMA SHOME) होय. आपल्या अभिनयाबरोबरच ती स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. आता तिने तिच्याबरोबर घडलेला एक वाईट प्रसंग सांगितला आहे. तिलोत्तमाला राजधानी दिल्लीत हा भयंकर अनुभव आला होता.“मी दिल्लीत एके ठिकाणी बसची वाट पाहत थांबले होते. थंडीचे दिवस होते आणि अंधार पडला होता. त्याचवेळी एक कार माझ्या जवळ येऊन थांबली, त्या कारमध्ये सहा जण होते. त्यांना पाहून मला अस्वस्थ वाटलं आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मी तिथून थोडी दूर गेले. नंतर त्यांनी माझ्याकडे पाहून विचित्र हावभाव करायला सुरुवात केली, तसेच कोणीतरी माझ्यावर एक छोटा दगड फेकला. त्याचवेळी मला लक्षात आलं की मी आता इथून निघायला हवं. मी तिथून पळण्याचा विचार केला, पण ते कारमध्ये होते, त्यामुळे मला सहज पकडू शकले असते. मग मी रस्त्याच्या मधोमध उभं राहून मदत मागायचं ठरवलं“त्यानंतर खूप गाड्या त्या रस्त्यावरून गेल्या, मग मला मेडिकल साइन असलेली एक कार दिसली. मला वाटलं की डॉक्टरची गाडी असल्याने मी सुरक्षित राहीन. मी त्या गाडीत पुढच्या सीटवर बसले. पण काही वेळाने गाडीच्या ड्रायव्हरने त्याच्या पँटची चैन उघडली आणि माझा हात पकडला. त्याने जबरदस्ती माझा हात त्याच्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला.



# साखरपुड्यानंतर मानसीची पहिली पोस्ट

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री मानसी नाईक (MANASI NAIK) हिच्या पूर्वाश्रमीच्या पतीने साखरपुडा उरकला आहे. बॉक्सर प्रदीप खरेरा (PRADEEP KHARERA ENGAGEMENT) याने विशाखा जाटनी हिच्याशी साखरपुडा केला आहे. विशाखाने एक रील इन्स्टाग्रामवर शेअर करत साखरपुड्याची माहिती दिली. त्यांच्या साखरपुड्याची बातमी समोर आल्यानंतर मानसी नाईकने केलेल्या पहिल्या पोस्टने लक्ष वेधले आहे. मानसीने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. तिची स्टोरी पाहिल्यानंतर लवकरच ती चाहत्यांना काही आनंदाची बातमी देणार

# पूजा सावंतने ऑस्ट्रेलियात ‘अशी’ जपली मराठमोळी परंपरा

राज्यभरात ६ जुलैला मोठ्या जल्लोषात आषाढी एकादशीचा उत्सव साजरा करण्यात आला. मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी आषाढी एकादशीनिमित्त मनोभावे पूजा करून. खास पोस्ट शेअर सर्वांना शुभेच्छा दिल्याचं पाहायला मिळालं. याशिवाय काही कलाकार विठुरायाचं दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला देखील पोहोचले होते. अनेकांनी वारीतही सहभाग घेतला होता. अशातच आता महाराष्ट्राची ‘कलरफुल’ अभिनेत्री पूजा सावंतने शेअर केलेला व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. यंदा पूजाने आषाढी एकादशीचा सण पतीसह ऑस्ट्रेलियात साजरा केला. पूजाचा नवरा कामानिमित्त ऑस्ट्रेलियात असतो. त्यामुळे अभिनेत्री देखील मुंबई ते ऑस्ट्रेलिया असा प्रवास करत असते. चित्रपटांचं शूटिंग असलं की ती मुंबईत येते आणि बाकीचे दिवस ऑस्ट्रेलियात राहते. यावर्षी पूजाने आषाढी एकादशीचा उपवास सोडताना



देवाला दाखवण्यासाठी खास नैवेद्य केला होता.“नैवेद्य करायचा माझा छोटासा प्रयत्न” असं कॅप्शन देत पूजाने हा व्हिडीओ शेअर केला आहे. वरण-भात, चवळीची उसळ, चपाती, अळुवडी, बट्ट्याची भाजी, शिरा असं सगळं साग्रसंगीत जेवण पूजाने केलं होतं. यानंतर अभिनेत्रीने देवाची मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवला. पूजा हा व्हिडीओ शेअर करत म्हणते, “पहिल्यांदाच नैवेद्य बनवण्याचा प्रयत्न केला. जेवण बनवणं खूप कठीणच आहे पण, त्याहूनही कठीण आहे ते जेवण बनवताना सगळ्या गोष्टी शूट करणं...मी पुन्हा जेवण बनवताना कदाचित असं रेसिपी शूट नाही करणार.” पूजाने ऑस्ट्रेलियात राहूनही आपली मराठमोळी परंपरा जपत आषाढी एकादशीचा उपवास सोडताना नैवेद्याचं जेवण बनवलं होतं; त्यामुळे सध्या अभिनेत्रीवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. या व्हिडीओवर पूजाने “खेळ मांडियेला वाळवंटी घाई” हे गाणं लावलं आहे.दरम्यान, पूजाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं, तर अभिनेत्री फेब्रुवारी २०२४ मध्ये लग्नबंधनात अडकली. तिने सिद्धेश चव्हाणशी लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली. अभिनेत्रीचा पती कामानिमित्ताने ऑस्ट्रेलियात राहतो. त्यामुळे पूजा कधी ऑस्ट्रेलिया तर कधी मुंबईत असते. परदेशात राहूनही पूजा मराठी परंपरा, मराठीसण मोठ्या उत्साहाने साजरे करताना दिसते.राज्यभरात ६ जुलैला मोठ्या जल्लोषात आषाढी एकादशीचा उत्सव साजरा करण्यात आला. मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी आषाढी एकादशीनिमित्त मनोभावे पूजा करून. खास पोस्ट शेअर सर्वांना शुभेच्छा दिल्याचं पाहायला मिळालं. याशिवाय काही कलाकार विठुरायाचं दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला देखील पोहोचले होते. अनेकांनी वारीतही सहभाग घेतला होता. अशातच आता महाराष्ट्राची ‘कलरफुल’ अभिनेत्री पूजा सावंतने शेअर केलेला व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. यंदा पूजाने आषाढी एकादशीचा सण पतीसह ऑस्ट्रेलियात साजरा केला. पूजाचा नवरा कामानिमित्त ऑस्ट्रेलियात असतो. त्यामुळे अभिनेत्री देखील मुंबई ते ऑस्ट्रेलिया असा प्रवास करत असते. चित्रपटांचं शूटिंग असलं की ती मुंबईत येते आणि बाकीचे दिवस ऑस्ट्रेलियात राहते. यावर्षी पूजाने आषाढी एकादशीचा उपवास सोडताना देवाला दाखवण्यासाठी खास नैवेद्य केला होता.“नैवेद्य करायचा माझा छोटासा प्रयत्न” असं कॅप्शन देत पूजाने हा व्हिडीओ शेअर केला आहे. वरण-भात, चवळीची उसळ, चपाती, अळुवडी, बट्ट्याची भाजी, शिरा असं सगळं साग्रसंगीत जेवण पूजाने केलं होतं. यानंतर अभिनेत्रीने देवाची मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवला.पूजा हा व्हिडीओ शेअर करत म्हणते, “पहिल्यांदाच नैवेद्य बनवण्याचा प्रयत्न केला. जेवण बनवणं खूप कठीणच आहे पण, त्याहूनही कठीण आहे.

# वियान मुल्डर आहे तरी कोण?

## भारतीय संघाला अशा खेळाडूची का आवश्यकता आहे?

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**संधीचं सोनं कसं करावं याचं सप्रमाण उदाहरण सादर करत दक्षिण आफ्रिकेच्या वियान मुल्डरने इतिहास घडवला. झिम्बाब्वेविरुद्धच्या बुलावायो इथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटीत मुल्डरने ४०० धावांची खेळी करत अद्भुत विक्रमाला गवसणी घातली. सार्वकालीन महान फलंदाज ब्रायन लाराचा ४०० धावांचा अशक्य वाटणारा विक्रम मुल्डरने मोडला.**




काही दिवसांपूर्वीच दक्षिण आफ्रिकेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या जेतेपदावर कब्जा केला होता. यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर रवाना झाला. निवडसमितीने या दौऱ्यासाठी प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्याचा निर्णय घेतला. पहिल्या कसोटीत फिरकीपटू केशव महाराजने नेतृत्वाची धुरा हाताळली. मात्र कसोटीदरम्यान महाराज दुखापतग्रस्त झाला. यामुळे दुसऱ्या कसोटीसाठी मुल्डरकडे कर्णधारपद सोपवण्यात आलं. या जबाबदारीचं कोणतंही दडपण न घेता मुल्डरने ४०० धावांची अविश्वसनीय खेळी साकारली. अष्टपैलू खेळाडू असं त्याचं वर्णन केलं जातं. २०१७ मध्ये मुल्डरने दक्षिण आफ्रिकेसाठी वनडे पदार्पण केलं. वनडेत चांगल्या कामगिरीचं फळ म्हणून २०१९ मध्ये त्याला टेस्ट पदार्पणाची संधी देण्यात आली. २०२१ मध्ये मुल्डरने दक्षिण आफ्रिकेसाठी टी२० पदार्पण केलं. कागिसो रबाडा, लुंगी एन्गिडी, मार्को यान्सन, ॲनरिक नॉर्किया असे एकापेक्षा एक गोलंदाज संघात असल्यामुळे मुल्डरला सातत्याने संधी मिळणं कठीण होतं. मात्र तरीही गोलंदाज म्हणूनच त्याची ओळख होती. फलंदाजी करताना तो सातव्या-आठव्या क्रमांकावर येत असे. त्यामुळे मोठी खेळी करण्याची संधी त्याला मिळत नसे.नोव्हेंबर २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघव्यवस्थापनाने श्रीलंकेविरुद्धच्या कसोटीत मुल्डरला तिसऱ्या क्रमांकावर बढती देण्याचा प्रयोग केला. मुल्डर यात फारसा यशस्वी झाला नाही. त्याने १५ धावांची खेळी केली. पाकिस्तानविरुद्धच्या कसोटीतही मुल्डरला तिसऱ्या क्रमांकावरच पाठवण्यात आलं. यातही मुल्डरला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेने दोन्ही सामना जिंकल्यामुळे मुल्डरच्या अपयशाची फारशी चर्चा झाली नाही. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलच्या मुकाबल्यातही दक्षिण आफ्रिकेने मुल्डरवरच विश्वास ठेवला. अत्यंत दडपणाच्या अशा या सामन्यात मुल्डरने पहिल्या डावात ६ धावा केल्या. मात्र दुसऱ्या डावात धावांचा पाठलाग करताना मुल्डरने २७ धावांची छोटी पण आश्वासक खेळी केली. मुल्डर तिसऱ्या क्रमांकावर खेळल्यास दक्षिण आफ्रिकेला अतिरिक्त गोलंदाज किंवा फलंदाज खेळवता येतो.दक्षिण आफ्रिकेच्या मुख्य गोलंदाजांना बॅकअप बॉलर म्हणूनही तो फिट बसतो. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्या सांभाळणाऱ्या मुल्डरमुळे दक्षिण आफ्रिकेच्या संघाला संतुलन मिळालं. झिम्बाब्वेविरुदद्धच्या पहिल्या टेस्टमध्ये मुल्डरने १७ आणि १४७ धावांची खेळी साकारली.

### टीम इंडियालाही हवा एक मुल्डर

याबरोबरच त्याने ४ विकेट्सही पटकावल्या. दुसऱ्या सामन्यात थेट ४०० धावांची खेळी करत मुल्डरने इतिहास घडवला.ग्रॅमी स्मिथ, हर्षेल गिब्ज, जॅक कॅलिस, शॉन पोलॉक, लान्स क्लुसनर, जॉन्टी ऱ्होड्स, फाफ डू प्लेसिस, एबी डीव्हिलियर्स, डेल स्टेन, मॉर्ने मॉर्केल हे दिग्गज खेळाडू निवृत्त झाले आहेत. तेंबा बावूमाने युवा संघाची मोट बांधली आहे. मोठी धावसंख्या उभारण्याच्या दृष्टिकोनातून तिसरा क्रमांक अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. दक्षिण आफ्रिकेने गेल्या दोन वर्षात तिसऱ्या क्रमांकावर मुल्डरसह ट्रिस्टन स्टब्ज, रायल रिकलटन, रायनार्ड व्हॅन टोंडर, टोनी द झोरी यांना संधी दिली आहे. सहा विशेषज्ञ फलंदाज, विकेटकीपर आणि चार गोलंदाज असं समीकरण खेळवल्यास फलंदाजी न येणाऱ्या मंडळींचं शेपूट वाढतं. अष्टपैलू मुल्डरच्या समावेशामुळे संघाला संतुलन मिळू लागलं. यामुळे हा प्रयोग कायम करण्यात आला.

# कानामागून आला अन् 'त्रिशतकवीर' झाला!

## वियान मुल्डरने दुसऱ्या कसोटी सामन्यात त्रिशतकी खेळी

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दक्षिण आफ्रिकन क्रिकेटचा सुवर्णकाळ सुरु झाला आहे. काही दिवसांपूर्वी दक्षिण आफ्रिकेने तेंबा बावूमाच्या नेतृत्वाखाली खेळताना वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाला पराभूत केलं. यासह २७ वर्षांनंतर आयसीसीच्या ट्रॉफीवर नाव कोरलं. या स्पर्धेनंतर दक्षिण आफ्रिकेचा दोन कसोटी सामन्यांची मालिकेसाठी झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे. या दौऱ्यातून संघातील प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे.**




त्यामुळे पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेची जबाबदारी केशव महाराजकडे सोपवण्यात आली. तर दुसऱ्या सामन्यात ही जबाबदारी वियान मुल्डरकडे सोपवली. ही जबाबदारी स्वीकारून त्याने कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात त्रिशतकी खेळी करण्याचा ऐतिहासिक कारनामा केला आहे.दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे. या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेसाठी युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. पहिल्या सामन्यात या संघाची धूरा केशव महाराजच्या हातात होती. मात्र, तो दुखापतग्रस्त असल्याने दुसऱ्या सामन्यासाठी संघाचा कर्णधार बदलावा लागला. संघात इतर कुठलाही वरिष्ठ खेळाडू नसल्याने ही जबाबदारी वियान मुल्डरकडे सोपवण्यात आली.कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात या पठ्ठ्याने असं काही करून दाखवलं आहे, जे कसोटी क्रिकेटच्या १५० वर्षांच्या इतिहासात कोणालाच जमलं नव्हतं. झिम्बाब्वेविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीत मुल्डरने २९७ चेंडूंचा सामना करत आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिलं त्रिशतक झळकावलं आहे. यासह तो कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात त्रिशतकी खेळी करणारा पहिलाच कर्णधार ठरला आहे. याआधी कुठल्याही कर्णधाराला आपल्या पहिल्याच सामन्यात असा कारनामा करता आलेला नाही. या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या ५०० धावांच्या पार पोहोचवली आहे.वियान मुल्डर हा दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू आहे.

### मुल्डरची अविश्वसनीय खेळी

वियान मुल्डरने वेगवान गोलंदाज म्हणून संघात स्थान मिळवलं. म्हणून आठव्या क्रमांकाला फलंदाजीला येणारा गोलंदाज अशी त्याची ओळख. पण, त्याचं फलंदाजीतील कौशल्य पाहून त्याला ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवलं.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार।

। दि. 8 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार आढावा बैठक

# ‘हिंजवडी आयटी पार्क’मधील आयटीयन्ससाठी ‘आशेचा किरण’

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ‘हिजवडी आयटी पार्क’ला समस्यांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आता राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार, आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनसह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, संबंधित विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात येणार आहे.**



हिंजवडी आयटी पार्क यावर्षी पहिल्याच पावसात अक्षरश: ‘वॉटर पार्क’ झाला. वाहतूक कोंडी, पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि वीज समस्यांमुळे या आयटी पार्कमधील आयटीयन्स आणि विविध कंपन्यांचे अधिकारी अक्षरश: हैराण झाले आहेत. त्यामुळे आयटीयन्स आणि सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून ‘अनलॉग हिंजवडी’ असे स्वाक्षरी अभियान राबवले होते. या अभियानाला सुमारे 30 हजार आयटीयन्सनी पाठिंबा दिला आहे. दरम्यान, हिंजवडी आयटी पार्कच्या समस्यांबाबत ठोस उपाययोजना करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये एमआयडीसी, जिल्हा परिषद, पीएमआरडीए, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसह आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींची सविस्तर आढावा बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, गुरूवारी, दि. 10 जुलै रोजी दुपारी 2 वाजता मंत्रीमंडळ, सभागृह, विधानभवन येथे बैठकीचे नियोजन केले आहे. या बैठकीत आयटीयन्स आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींना बाजू मांडता येणार आहे. तसेच, प्रमुख लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

> “ हिंजवडी आयटी पार्कमध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून सुमारे 5 लाख आयटी कर्मचारी व अधिकारी नियमित ये-जा करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या आहे. तसेच, एमआयडीसी, जिल्हा परिषद, पीएमआरडीए, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा विविध विभागांमध्ये सक्षम समन्वय नाही. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा आयटी पार्क पण सुविधांअभावी जगभरात शहराची प्रतिमा मलीन होते आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करावा, अशी विनंती केली आहे. त्याबाबत बैठकीमध्ये निश्चितपणे ठोस निर्णय होईल, असा विश्वास आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.




BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune


*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

DYP DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open:** AY 2025 – 26*
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open:** AY 2025 – 26*
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK | wipro | NTT DATA | virtusa | B&R | Emcure | KNORR-BREMSE | NuLife | CitiusTech | SHL | McKinley Rice | bvg | Technouniq | RPG | CONSTROLOGIX | NASSCOM FOUNDATION | INDOVANCE | Tech Mahindra | DataTech Labs | EMERSON | newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

DESIGNED BY SHRIPRASAD S PATIL

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**